# भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कम्युनिस्ट पक्षाचा सहभाग

**सिद्धेश्वर रामचंद्र गाडीलोहार,** संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. मोबाईल नं.8087694748 ई-मेल.sidhesh1982@gmail.com.

---

**प्रस्तावना:**

एकोणिसावे शतक हे जगाच्या इतिहासामध्ये बदल घडवून आणणारे शतक आहे. या शतकांमध्ये अनेक नवीन विचारवंतांचा उदय झाला. त्यामध्ये प्रमुख समाजवादी विचारवंत कार्ल मार्क्स होय. कार्ल मार्क्स याने सन 1948 साली कम्युनिस्ट लीग ची स्थापना केली. कम्युनिस्ट लीग मजूर आणि कामगारांच्या हक्कासाठी लढा देऊ लागली, एवढेच नाही तर त्याचा जगभर प्रचार आणि प्रसार होऊ लागला. या समाजवादी पक्षाचा सर्वात जास्त प्रभाव रशियन क्रांतीमध्ये दिसून आला. तसेच रशियन क्रांतीचा प्रभाव सर्व जगभर दिसून येऊ लागला.

त्यामध्ये भारत हा एकमेव असा देश होता, ज्यामध्ये ब्रिटिशांची सत्ता होती. भारतीय जनता ही स्वातंत्र्य मिळविण्यासाठी संघर्ष करत होती. भारतामध्ये स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जहाल आणि मवाळ असे दोन गट प्रयत्न करत होते. त्यातच समाजवादी विचारांचे आगमन झाले, त्यातूनच भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. त्यासोबतच ब्रिटिशांविरोधात आंदोलन चळवळ करू लागले. या लेखामध्ये भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी समाजवादी विचारांच्या प्रभावाने प्रभावित होऊन इंग्रजांविरुद्ध लढा देऊन इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कम्युनिस्ट पक्षांनी सहभाग नोंदवला.

कम्युनिस्ट पक्षाच्या सहभागामुळे ब्रिटिश "साम्राज्यवाद्यांना हा एक 'बोल्शेविक' धोका वाटला. आणि या धोक्याचे दमन करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार मार्च 1929 मध्ये सर्व कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. व खटला पडला. राज्य उलथून पाडण्याच्या आरोपाखाली खटला रचला हाच गाजलेला 'मीरत कटाचा' खटला. हा खटला अनेक दिवस चालला. या खटल्यातील 35 पैकी काही आरोपी जहाल राष्ट्रवादी होते. या खटल्याने देशांमध्ये एक नवीन राजकीय क्रांती निर्माण झाली. व राष्ट्रीय चळवळीला क्रांतिकारक दिशा मिळाली. खटल्यातील आरोपी ची जबानी ही राष्ट्रीय स्वातंत्र्याचा व क्रांतीकारी समाजपरिवर्तनाचा एक जाहीरनामा होता"1

भारतामध्ये ब्रिटीश सरकार विरोधात कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष हे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी चळवळी करत होते. ब्रिटिश सरकारला या दोन्ही पक्षाचे कार्य प्रभावी आणि सकारात्मक वाटत होते. ब्रिटिश सरकारला भारतीय यांच्या मागण्या मोठ्या प्रमाणात मान्य कराव्या लागत होत्या.

“सारे भारत देश में सन1929 के बाद युवक संघटन संघटित हो गये. 1928और 1929 के दौरान पूरे देश मे सैंकडों अधिवेशन संघटित किए गये. जीन राजनीतिक आर्थिक-सामाजिक बुराईयों से देश पीडित था, इसके वक्ताओ ने इनसे छुटकारा पाने के लिए,

क्रांतिकारी हल की वकालत की. जवाहरलाल नेहरू और सुभाष चंद्र बोस ने पुरे देश का दौरा किया. अपने दौरे में उन्होने साम्यवाद, पूंजीवाद, और जमीनदारी प्रथा की आलोचना की, और साम्यवादी विचारधारा अपनाने की शिक्षा दी. भगतसिंग , चंद्रशेखर आजाद के नेतृत्व वाले आतीवादी क्रांतिकारक भी साम्यवादी विचारधारा की और झुके. पुरे दुसरे दशक के दौरान ट्रेड यूनियन तथा किसान आंदोलन तेजी से फैलते रहे."2

भारतात विविध राज्यात विद्यार्थी ,शेतकरी ,कामगार इत्यादी अनेक संघटना स्थापन होऊ लागल्या. कारण की " भारतात स्वातंत्र्य आणायचे असेल तर संघटना महत्त्वाची होती, तसेच तरुण मंडळी समाजवादी विचारांनी प्रभावित होऊन जास्त जोमाने कार्य करत होती. याच बरोबर देशातील विद्यार्थी ही देशाची चालू परिस्थिती ओळखून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे ही ते ध्येय मानत होते. साम्राज्यवाद ,आर्थिक परिस्थिती भांडवलदारांच्या विरोधात लढा लढण्यास कोणीही भीती बाळगत नव्हते. गरिबी बेकारी कोणामुळे येऊ लागली हे विद्यार्थ्यांना सर्व समजत होते. आणि त्यामुळेच स्वातंत्र्य संग्रामात हिरीरीने सहभाग घेत होते.

जवाहरलाल नेहरू ने स्वतंत्रता के लिए भारतीय संघ गठित करने के लिए सुभाष चंद्र बोस के साथ सहयोग का हात बढाया, ताकि पूर्ण स्वराज्य के लिये समाज के आर्थिक ढाँचे को समाजवादी रूप देने के लिए संघर्ष किया जा सके.1929 मे कांग्रेस के लाहोर अधिवेशन में जवाहरलाल नेहरू ने घोषणा ,की," मै समाजवादी और लोकतंत्र वादी हूँ, और राजाओं राजकुमारों में मेरा विश्वास नही है. मेरा उस व्यवस्था मे भी विश्वास नही है जो उद्योगों में आधुनिक राजाओं को जन्म देती है. जिन की शक्ति और आम आदमी पर जिनका नियंत्रण राजा-महाराजाओं से भी अधिक है, और उनके तर तरिके लुटेरे जैसे है जो पुराने निरंकुश सामंतों के हुआ करते थे." उन्होंने कहा कि भारत की गरीबी और असमानता को समाप्त करना है तो भारत को एक समग्र समाजवादी कार्यक्रम अपनाना होगा. कांग्रेस के लिये श्रमिक और पूंजिपती ,जमीदार और कास्तकार के बीच कायम संतुलन बनाये रखना संभव नही था . क्योंकी वर्तमान संतुलन बुरी तरह से पूंजिपति और भूस्वामी के पक्ष में था."3

भारतीय तरुणांना आणि छोट्या मोठ्यांना भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देऊन पूर्णपणे लोकशाहीची स्थापना करून घ्यावयाची होती. तसेच लोकशाही पद्धतीचे सरकार स्थापन करावयाचे होते. देशातील प्रत्येक व्यक्तीला देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचा कायदा होण्यासाठी संघर्ष केला जात होता. भारतातील तरुण मंडळीही समाजवादी विचाराने प्रभावित होऊन कार्य करीत होती.

सन1930 च्या सुमारास ज्यावेळी मिरत कटाचा खटला चालू होता, भगतसिंग व त्यांच्या साथीदारांना फाशीच्या फाशीची शिक्षा देण्यात आली त्यावेळी बराचसा मोठा गट हा मार्क्सवाद व लेनिन वादाने प्रभावित झाला होता. परंतु कम्युनिस्ट पक्षात नव्हता. कॉम्रेड डांगे यांनी म्हटले आहे की भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना जर फाशी झाली नसती तर, भगतसिंगाच्या प्रेरणेने कम्युनिस्ट पक्षाला एक नवी उभारी मिळाली असती. व

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा मिळाली असती.1931 साली बंगालमध्ये जहाल राष्ट्रवादी यांचा सशस्त्र लढा चालू होता. शास्त्रगारा या गटातर्फे कवी हल्ला करण्यात आला. त्यांच्यावर खटला उभारण्यात आला. तोही राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या क्रांतिकारक तेला सहाय्यभूत ठरला. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून1934 सा ली कम्युनिस्ट पक्षावर पुन्हा एकदा बंदी घालण्यात आली. राष्ट्रीय चळवळीचा इतिहासामध्ये 1936 हे साल महत्त्वाचे ठरले. 1935 च्या कायद्याने प्रांतिक सरकारची स्थापना व्हावयाची होती, देशामधील चळवळीला उधान आले होते, 1936साली लखनऊला काँग्रेसचे अधिवेशन भरले, या अधिवेशनामध्ये कम्युनिस्ट पक्षाचा महत्वपूर्ण सहभाग होता. या अधिवेशनामध्ये किसान सभा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या सालामध्ये विद्यार्थी व युवक संघटना स्थापन करण्यात आल्या.

त्या संघटना होत्या, "ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन, ऑल इंडिया स्टुडंट्स, पीपल्स कॉन्फरन्स, आणि ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह असोसिएशन या तीन जन संघटनांची स्थापना केली गेली. याच काळात 1936 च्या डिसेंबर मध्ये फैजपूर येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशना समोर शेतकऱ्यांच्या मागण्या संघटित करण्यात कम्युनिस्ट पक्षांनी पुढाकार घेतला."4

कम्युनिस्ट पक्षाच्या या जनसंघटना या जनसामान्यात राहून , सर्वांना सोबत घेऊन कार्य करत होती. यामध्ये विद्यार्थी शेतकरी मजूर कामगार यांच्या समस्या तसेच हक्काबाबत या संघटना कार्य करत होत्या. या काळात कम्युनिस्ट पक्षावर इंग्रज सरकारने बंदी घातली होती. म्हणून कम्युनिस्ट पक्ष हा आपल्या पक्षाचे कार्य काँग्रेस पक्ष आणि जनसंघटना यांच्यासोबत करत होता. जनसंघ घटनेमुळे कम्युनिस्ट पक्षाची सदस्यसंख्या ही वाढत होती.

"एक बार पुन:कम्युनिस्ट पार्टी राष्ट्रीय कांग्रेस के साथ अपने संबंधों को सदृढ करने लगे. जिसने अपने सभी सदस्य को शामिल होने के लिए कहा, और यह भी कहा कि अपने प्रभावक्षेत्र मे काम करने वाले लोगों से भी कहा कि काँग्रेस मे शामिल हो.1938 में थोडा और आगे बढकर कम्युनिस्ट पार्टी ने स्वीकार किया कि,"5

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस भारतीय जनता का केंद्रीय संघटन है, जो साम्राज्य के विरोध में खडा है.1939 मे पी .सी. जोशीने पार्टी के साप्ताहिक पत्र" नॅशनल फ्रंट" मे लिखा की, आज हमारा सबसे बडा वर्गसंघर्ष राष्ट्रीय संघटन है और कांग्रेस का अंग है. इसके साथ ही मजदूर वर्ग के नेतृत्व में राष्ट्रीय आंदोलन को लाने के प्रति अपने प्रतिबद्धता के उद्देश पर भी पार्टी कायम रही, यहा पार्टी कम्युनिस्ट पार्टी थी. इस दौरान कम्युनिस्ट ने कांग्रेस के भीतर अत्यंत मेहनत से काम किया. कांग्रेस के जिल्हा प्रांतीय काँग्रेस समितीयों में अनेक लोगो ने पदाधिकारियों के रूप मे भी काम किया."6

सन 1939 साली संपूर्ण जग दुसऱ्या महायुद्धाला सामोरे गेले. तसेच भारतातील इंग्रज साम्राज्य विरोधात लढा हा सर्व बाजूने लढला जात होता. या लढ्यात लहान, मोठे, स्त्री-पुरुष,कामगार, मजूर, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करत होते. या काळात

भारतीयांनी इंग्रजांना मदत करण्याचे आश्वासन दिले परंतु त्या बदल्यात भारत देश संपूर्ण स्वातंत्र्य करून घेण्याचे आश्वासन घेतले.

इ.स.1942 सा ली भारतात इंग्रज सरकार विरोधात चलेजाव आंदोलन सुरू झाले होते." भारत छोडो आंदोलन से साम्यवादियों के उदासीन तथा उसका विरोध करने के बावजूद भारत छोडो आंदोलन से मजदूर वर्ग बिल्कुल अछूता नही था.9 अगस्त1942 को गांधीजी तथा दुसरे नेताओं की गिरफ्तारी के तत्काल बाद भारत छोडो प्रस्ताव के समर्थन मे मजदूरों ने देशभर मे दिल्ली, कानपूर, लखनऊ, मुंबई, नागपूर ,अहमदाबाद ,जमशेदपूर, मद्रास, इंदौर बंगलोर,आदि स्थानो पर हडतालें की. ये हडताले लगभग एक सप्ताह तक चली. हडतालियों के इस नारे के साथ टाटा स्टील प्लांट उन्नीस दिन तक बंद रहा. मजदूरोंने ठाण लिया कि तब तक काम पर नहीं जाएँगे जब तक देश में राष्ट्रीय सरकार नही बन जाती. अहमदाबाद सुती कपडा मी लगबग साडेतीन महिने हडताल रही. मिल मालिकों के राष्ट्रवादी सुख भोग में वास्तव में वे सहयोगी थे. यद्यपि साम्य वादियों के प्रभाव क्षेत्र में मजदूरों का सहयोग भारत छोडो आवाहन से तेजी से शामिल हुए."7

भारतामध्ये स्वातंत्र्यासाठी चाललेले संप आंदोलन चळवळ याच दरम्यान दुसरे महायुद्ध ही सुरू होते. भारतीयांचे महत्त्वपूर्ण व लक्ष स्वातंत्र्य मिळवणे हे होते. भारत छोडो चले जाव आंदोलनाने ब्रिटिश सरकारवर बराच दबाव पडला होता. भारताला स्वातंत्र्याचे आश्वासन दिले होते , चलेजाव आंदोलन पूर्ण भारतात झाले होते. या आंदोलनात मजूर कामगारांचा शेतकऱ्यांचा विशेष सहभाग जास्त प्रमाणात होता.

चलेजाव आंदोलनानंतर भारतात ब्रिटीश सरकार विरोधात आंदोलन सुरु होते, या नौसेनेच्या युद्धात महाराष्ट्राच्या महिला कमल दोंदे ही महिला गोळी बारा मध्ये मारली गेली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कम्युनिष्ठ पक्षाच्या कार्यकर्त्यांनी समाजवादी दृष्टिकोन ठेवून जो लढा लढला गेला त्या लढ्याला काही अंशी यश संपादन झाले. कारण 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले, कम्युनिस्ट पक्षाच्या दृष्टीने हे स्वातंत्र्य म्हणजे राजकीय आणि भांडवलदार लोकांच्या हातात दिलेला कारभार होय.

**निष्कर्ष:**

भारतामध्ये इंग्रजांच्या व्यापारात सतराव्या शतकांमध्ये सुरुवात झाली. त्यावेळी भारतात राजेशाही पद्धत अस्तित्वात होती. त्याचबरोबर इंग्रजांची भारताकडे आकर्षण होते ते म्हणजे व्यापार. भारतात कच्च्या मालाचे उत्पादन भरपूर प्रमाणात होते. भारतात इंग्रजांनी डच फ्रेंच पोर्तुगीज अशा अनेक परकीय सत्तांना भारतात व्यापार केला. कालांतराने इंग्रजांनी भारतात राजकीय वर्चस्व निर्माण करून भारताच्या प्रशासनाची धुरा ईस्ट इंडिया कंपनीचा अधिपत्याखाली सांगण्यास सुरुवात केली. म्हणजे की भारतात वेगवेगळ्या राज्यांमध्ये राजकीय वर्चस्व निर्माण करून तेथील भूप्रदेश त्यांच्या आधिपत्याखाली घेऊन महसूल गोळा करण्यास सुरुवात केली. पुढे चालून अठराशे सत्तावन साली इंग्रजांच्या विरोधात मोठा उठाव झाला, पण या उठावात भारतीयांना यश मिळाले नाही. आणि 1885 साली इंग्लंडच्या राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला, तेव्हापासून भारतामधील प्रशासकीय

अधिकार ईस्ट इंडिया कंपनीच्या ऐवजी राजेशाही घराण्याकडे म्हणजे राणीच्या आधिपत्याखाली प्रशासन चालवण्यात येऊ लागले. पण इंग्लंडमधील प्रशासन हे लोकशाही पद्धतीचे होते, पण वर्चस्व भारतात इंग्रज राजेशाहीचे होते. भारतामध्ये 1885 साली पहिले राजकीय पक्ष स्थापित झाले ते म्हणजे राष्ट्रीय काँग्रेस. या पक्षामार्फत भारतातील नेते इंग्रजांकडून संप, आंदोलन ,चळवळ करून भारतीय जनतेच्या मागण्या कायदा-सुव्यवस्था पूर्ण करून घेण्यासाठी मागणी पूर्ण करून घेऊ लागले. तसेच पुढे भारतात 1900 च्या नंतर कम्युनिस्ट पक्षाचे आगमन झाले, या पक्षाने भारतातील मजूर, कामगार ,शेतकरी ,महिला या सामान्य व्यक्तींसाठी भारताच्या स्वातंत्र्यासाठी, हक्कासाठी भारताचे स्वतंत्र शासन असावे म्हणजे की भारतात लोकशाही पद्धतीचे शासन स्थापित व्हावे,आणि लोकशाही प्रशासन चालावे यासाठी भारतात कम्युनिस्ट पक्षाने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

**संदर्भ सूची:**

1) ॲड. भगवानराव देशपांडे, समाजक्रांतीचे चिंतन, लोकवांगमय गृह प्रभादेवी, मुंबई, पृष्ठ.160
2) बिपिनचंद्र, भारत का स्वतंत्र संघर्ष, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय दिल्ली, पृष्ठ 161
3) कित्ता, पृष्ठ 235
4) तत्रैव, पृष्ठ 161
5) मोरे विठ्ठल, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, पृष्ठ,38
6) तत्रैव नंबर 2, पृष्ठ 240
7) कित्ता,पृष्ठ161